# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय,नांदेड.

पत्ता :गांधी पुतळयाजवळ,स्टेशन रोड नांदेड. फोन- ०२४६२-२३७१०१, Email :nandedrdc@gmail.com

जा.क्र.२०२०/आरबी-१/डेस्क२/टे-४/crpc-१४४/प्र.क्र.- १३ दिनांक. ०१.०३.२०२१

वाचाः-
१) साथरोग प्रतिबंध कायदा १८९७
२) आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५
३) सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना क्र.करोना/२०२०/ प्र.क्र.५८ /आरोग्य-५ दिनांक १४ मार्च २०२०.
४) मा.मुख्य सचिव,महाराष्ट्र शासन,महसूल व वन विभाग,आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन विभाग,मुंबई यांचे आदेश क्रं.DMU/२०२०/CR-९२/DISM-१, दि. २९.१०.२०२०, दि. ०३.११.२०२०, दि. १४.११.२०२०, दि. २७.११.२०२०, दि. २१.१२.२०२०, दि. २९.१२.२०२०, दि. २९.०१.२०२१ व दि. २४.०२.२०२१.
५) या कार्यालयाचे समक्रमांकीत फौजदारी प्रक्रीया संहिता १९७३ चे कलम १४४ प्रमाणे आदेश, दिनांक ३१.१०.२०२०, दिनांक ०४.११.२०२०, दिनांक १५.११.२०२०, दि. २८.११.२०२०, दि. २२.१२.२०२०, दि. ३०.१२.२०२० व दि. २९.०१.२०२१.

**विषयः** कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय योजनाच्या अनुषंगाने नांदेड जिल्हयात दिनांक ३१.०३.२०२१ पर्यंत ताळेबंदीचा (Lockdown) कालावधी वाढविणे बाबत.

## आदेश

ज्याअर्थी या कार्यालयाचे संदर्भ क्रमांक ०५ वरील आदेशान्वये नमूद नियमावलीसह दिनांक २८/०२/२०२१ पर्यंत नांदेड जिल्हयात नागरी, ग्रामीण व औद्योगिक क्षेत्रासाठी विविध अटी व शर्तीच्या अधिन राहून आस्थापना व दुकाने चालू ठेवण्यास मुभा देण्यात आली होती.

आणि ज्याअर्थी संदर्भ क्र.०४ वरील नमुद मा.मुख्य सचिव,महाराष्ट्र शासन यांचे आदेश दि. २४.०२.२०२१ नूसार राज्यात Mission Begin Again अंतर्गत काही निर्बंध सुकर करण्यासह नियम व अटीच्या अधिन ताळेबंदीचा कालावधी दिनांक ३१.०३.२०२१ पर्यंत वाढवून मार्गदर्शक सुचना, निर्देश निर्गमित केले आहेत.

आणि ज्याअर्थी साथरोग प्रतिबंधक कायदा १८९७ च्या मधील तरतूदीनुसार संदर्भात नमूद अधिसूचना दिनांक १४,मार्च २०२० मध्ये मला उक्त प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाय योजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे. तसेच फौजदारी प्रक्रिया दंड संहिता १९७३ नूसार मला प्रदान अधिकारान्वये मी डॉ.विपीन इटनकर (भा.प्र.से.) जिल्हादंडाधिकारी नांदेड, फौजदारी प्रक्रिया दंड संहिता १९७३ चे कलम १४४ (१)(३) अन्वये या आदेशाव्दारे संदर्भात नमुद या कार्यालयाचे आदेश दिनांक ३१.१०.२०२०, दिनांक ०४.११.२०२०, दिनांक १५.११.२०२०, दिनांक २८.११.२०२०, दिनांक ३०.१२.२०२० व दिनांक २९.०१.२०२१ मधील अटी व शर्ती जशास तसे लागू करून **संपूर्ण नांदेड जिल्हयात दिनांक ३१.०३.२०२१ पर्यंत ताळेबंदीचा कालावधी वाढविण्यात येत आहे.**

सदर आदेशाची अंमलबजावणी करणा-या सर्व अधिकारी यांनी वरिल नियमांची अंमलबजावणी काटेकोरपणे, नियमाला धरून व मानवी दृष्टीकोनातून करावी.

सदरील आदेशाचे पालन न करणा-या कोणतीही व्यक्ती, संस्था अथवा समुह हे साथरोग प्रतिबंधक कायदा १८९७ व आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ आणि भारतीय दंड संहिता १८८ नुसार शिक्षेस पात्र असलेला अपराध केला असे मानण्यात येईल व कारवाई करण्यात येईल.

तसेच वरील आदेशाची अंमलबजावणी करीत असताना सद्हेतुन केलेल्या कृत्यासाठी कुठल्याही अधिकारी व कर्मचारी यांचे विरूध्द कुठल्याही प्रकारची कायदेशीर कारवाई अथवा खटला दाखल करता येणार नाही.

हे आदेश दि. ०१.०३.२०२१ रोजी माझे सही शिक्यानिशी निर्गमित करण्यात आली आहे.

(डॉ.विपीन इटनकर)भा.प्र.से.
जिल्हादंडाधिकारी नांदेड.

# <u>जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय,नांदेड.</u>

पत्ता :गांधी पुतळयाजवळ,स्टेशन रोड नांदेड. फोन- ०२४६२-२३७१०१, Email :nandedrdc@gmail.com

<u>प्रतिलिपी- माहीतीस्तव सादर</u>

१. मा.विभागीय आयुक्त औरंगाबाद.

<u>प्रतिलीपी - आवश्यक त्या कार्यवाहीस्तव</u>

२. पोलीस अधिक्षक, नांदेड.
३. आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड
५. सर्व उपविभागीय दंडाधिकारी नांदेड जिल्हा
६. सर्व पोलीस उपविभागीय अधिकारी, नांदेड जिल्हा
७. सर्व तालुका दंडाधिकारी नांदेड जिल्हा
८. सर्व संबंधित विभाग प्रमुख यांना अनुपालनास्तव
९. जिल्हा माहीती अधिकारी नांदेड यांना व्यापक प्रसिध्दीस्तव.

जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी नांदेड जिल्हा

(डॉ.विपीन इटनकर)भा.प्र.से.
जिल्हादंडाधिकारी नांदेड.